वर्ष : ०४ | अंक: ३६ | मुंबई, मंगळवार ३१ जुलै २०१८ ते ६ ऑगस्ट २०१८ | पृष्ठ: ४

# पोलीस बातमी पत्र

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. THW/205/2016-2018

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 मुंबईला महापुराचा धोका कायम!

3 → ज्येष्ठ पुन्हा वाऱ्यावरच!

मोदी सरकारच्या संकटात वाढ ← 4






# ९ ऑगस्टला मराठा समाजाचे राज्यव्यापी आंदोलन

**लातूर - मराठा आरक्षणप्रकरणी मराठा समाजाने आक्रमक भूमिका कायम ठेवली आहे. त्याचाच एक भाग म्हणून येत्या ९ ऑगस्ट रोजी राज्यव्यापी आंदोलन करण्यात येईल, असा निर्णय मराठा मोर्चाच्या रविवारी लातूर येथे आयोजित बैठकीमध्ये घेण्यात आला.**

मराठा समाज आरक्षणाबाबत सुरू असलेल्या आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यासाठी सकल मराठा समाजाच्या प्रतिनिधींची राज्यस्तरीय बैठक रविवारी लातूर येथे झाली. त्यावेळी या प्रतिनिधींनी सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेताना मुंबईत सह्याद्री अतिथीगृहात मुख्यमंत्री आणि मराठा आंदोलकांमध्ये झालेली बैठक आणि त्यातील निर्णय मान्य नसल्याची भूमिका मराठा आंदोलकांनी घेतली.

मुख्यमंत्र्यांनी मराठा समाजाबाबत केलेले वक्तव्य निषेधार्थ होते. आमचा लढा शासनाविरोधात आहे. वारीदरम्यान आम्ही वारकऱ्यांना वेठीस धरले नव्हते. मराठा समाजाबाबत उलटसुलट विधाने करून जातींमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न सरकारतर्फे करण्यात येत आहे, असा आरोप यावेळी मराठा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी केला. तसेच आंदोलनाची धार तीव्र करण्यासाठी यापुढे सर्व आंदोलने राज्यभरात एकसंधपणे राबवली जातील. तसेच ९ ऑगस्ट २०१८ रोजी मराठा समाजाचे राज्यव्यापी आंदोलन अश घोषणाही यावेळी करण्यात आली.



# पोलादपूर अपघात, दापोलीवर शोककळा!

## मृतांच्या नातेवाईकांना शिवसेनेकडून प्रत्येकी १ लाखांची मदत

**पोलादपूर येथील आंबेनळी घाटात बस दरीत कोसळून झालेल्या भीषण अपघातात मृत्युमुखी पडलेल्या ३० मृतांच्या नातेवाईकांना शिवसेनेकडून प्रत्येकी १ लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. शनिवारी या बसमधून दोपोली कृषी विद्यापीठाचे ३४ कर्मचारी वर्षासहलीसाठी निघाले होते. दरम्यान, आंबेनळी घाटात धुक्यामुळे आणि निसरड्या रस्त्यामुळे चालकाचे नियंत्रण गेल्याने बस ८०० फुट खोल दरीत कोसळली. यात ३० जणांचा मृत्यू झाला तर एकजण आश्चर्यकारकरित्या बचावला आहे. तर ३ जण अद्यापही बेपत्ता आहेत. घटनास्थळी ट्रेकर्स आणि एनडीआरएफकडून दरीतून मृतदेह बाहेर काढण्याचे काम सध्या थांबलं आहे. उर्वरित तिघांशी संबंधित कोणताही सुगावा न लागल्याने अखेर या बचाव पथकानं त्यांचं शोधकार्य थांबवण्यात आले आहे.**



दापोली कृषी विद्यापीठाचे कर्मचारी, विद्यार्थी आणि चालक असे मिळून ३४ जण शनिवारी सकाळी साडेसहा वाजता दापोली येथून महाबळेश्वर येथे सहलीसाठी निघाले होते. सहलीला निघण्यापूर्वी त्यांनी हास्यविनोदी वातावरणाचे छायाचित्रही काढले होते. मात्र काहीच तासांच्या आत या सगळ्यांच्या आनंदावर विरजण पडले. सकाळी साडेदहाच्या सुमारास त्यांची बस आंबेनळी घाटात आली असता एका वळणावर चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले. त्यामुळे बस दरीत कोसळून हा अपघात झाल्याचे समजते. अपघाताची माहिती मिळताच सातारा आणि रायगड जिल्हा प्रशासन, पोलीस यंत्रणेने घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक नागरिक, पोलिसांनी लगेच मदतकार्यास सुरुवात केली. यावेळी खोल दरीत उतरण्यासाठी गिर्यारोहकांचीही मदत घेण्यात आली. दुपारी १२ वाजता दरीत उतरलेल्या या मदत पथकास बसमधील एक वगळता सर्व जण मृत असल्याचे समजले. यानंतर हे मृतदेह दरीतून वर काढण्यास सुरुवात करण्यात आली. यासाठी एका मोठ्या क्रेनची मदत घेण्यात आली.

### राज्य सरकारकडून मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी ४ लाखांची मदत जाहीर

महाबळेश्वरनजीक पोलादपूर येथे शनिवारी बस दरीत कोसळून झालेल्या भीषण अपघातात ३२ जण ठार झाले आहेत. यांतील मृतांच्या नातेवाईकांना राज्य सरकारने प्रत्येकी ४ लाख रुपये मदत देण्याची घोषणा केली आहे. त्याचबरोबर यात जखमी झालेल्या व्यक्तीच्या उपचारांचा सर्व खर्चही सरकारकडून करण्यात येणार आहे.

# राज्यातील ९५ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**पुणे- राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी राज्यातील ९५ भारतीय पोलीस सेवा (आयपीएस) अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या. पुणे अणि पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक महत्त्वाच्या आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या आहेत.**



प्रामुख्याने पुणे शहर पोलीस उपायुक्त बसवराज तेली, पुणे शहर पोलीस उपायुक्त प्रवीण मुंडे, पुणे शहर पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पुणे पोलीस अधीक्षक (गुन्हे अन्वेषण) प्रसाद अक्कानवरू, पुणे ग्रामीण अप्पर पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, पुणे पोलीस उपायुक्त पंकज डहाणे, पुणे शहर पोलीस उपायुक्त दीपक साकोरे, पुणे शहर पोलीस उपायुक्त सुधीर हिरेमठ यांची पुणे शहरातून राज्यातील विविध शहर आणि जिल्ह्यांमध्ये बदली करण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवडच्या पोलीस उपायुक्त नम्रता पाटील, पिंपरी-चिंचवडचे पोलीस उपायुक्त विनायक ढाकणे, पुणे शहर पोलीस उपायुक्त बी. जी. गायकर, पुणे शहर पोलीस उपायुक्त संजय बाविस्कर, पुणे विशेष पोलीस महानिरीक्षक सुरेशकुमार मेकला, पुणे शहर सहपोलीस आयुक्त रवींद्र कदम, पुणे शहर पोलीस आयुक्त बच्चन सिंग, पुणे शहर पोलीस आयुक्त मंगेश शिंदे, पुणे शहर पोलीस आयुक्त प्रकाश गायकवाड, पुणे शहर पोलीस आयुक्त स्मार्तना एस. पाटील, पुणे शहर पोलीस आयुक्त सुहास पी. बावचे, पुणे शहर पोलीस आयुक्त शिरीष सरदेशपांडे, पुणे दहशतवादविरोधी पथक पोलीस अधीक्षक रवींद्रसिंग परदेशी, पुणे राज्य राखीव पोलीस दल गट १ समादेशक ए. एच. चावरिया, पुणे राज्य राखीव पोलीस दल गट २ समादेशक एम. रामकुमार, पुणे ग्रामीण अप्पर पोलीस अधीक्षक संदीप जाधव, गुन्हे अन्वेषण विभाग पोलीस उपमहानिरीक्षक डी. वाय. मंडलिक, पुणे शहर सहपोलीस आयुक्त एस. टी. बोडखे आदींची पुणे शहरामध्ये नियुक्ती करण्यात आली आहे.

# गुन्हेगारांचे कर्दनकाळ एसपी कृष्णकांत दोन दिवसांत येताहेत.. आम्हाला म्हणाले, जिल्ह्यातील गुन्हेगारीचा बिमोड करीन

**नागपूर-** २०११ च्या बॅचचे अधिकारी आणि गुन्हगारांचे कर्दनकाळ म्हणून अल्पावधीत ओळख झालेले नागपूरचे पोलीस सहआयुक्त कृष्णकांत उपाध्याय येत्या दोन ते तीन दिवसात परभणी दाखल होत आहेत या धाडसी अधिकाऱ्याशी सोमवारी सकाळी दहा वाजता थेट बोलणे झाले. मी नागपूरला आहे लवकरच पदभार सोडणार आहे आणि येत्या दोन दिवसात परभणी जिल्हा पोलीस अधीक्षकांची सूत्रे स्वीकारणार असल्याचे जिल्ह्याचे नवीन पोलीस अधीक्षक कृष्णकांत उपाध्याय यांनी सांगितलेय.



सोमवारी सकाळी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना त्यांनी परभणी जिल्ह्यात अतिशय उत्साहाने आणि उमेदीने काम करण्याची निसंदिग्ध ग्वाही दिला. उत्तर प्रदेशातील वाराणसी चे टॉपर असलेले कृष्णकांत उपाध्याय हे अत्यंत धाडसी अधिकारी म्हणून पोलिस दलात ओळखले जातात. विशेष म्हणजे अभियांत्रिकीचे शिक्षण घेतल्यानंतर देखील त्यांनी पोलीस दलात उच्च पदावर जाण्याचा निर्णय घेतला. गुन्हेगारी मोडून काढण्यासाठी आणि कायद्याची अंमलबजावणी नीट होण्यासाठी आपण पोलिस दलात आलो असल्याचं त्यांनी सांगितलं. परभणी जिल्ह्यातील गुन्हेगारी आपण निश्चितच मोडून काढू यासाठी सर्व नागरिकांचे सहकार्य घेऊ, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितलेय. परभणी जिल्ह्यातील नागरिकांच्या नेहमीच सदैव पाठीशी राहून काम करू असे सांगायलाही ते विसरले नाहीत.

# पोलिसांच्या सकर्ततेमुळे अवघ्या काही तासांतच वृद्ध महिलेस चाकूचा धाक दाखवून जबरी चोरी करणारे गुन्हेगार अटक



**मुंबई-** दिनांक २३-७-२०१८ रोजी दुपारी १४.०० ते १४.३० वा चे दरम्यान मिरारोड पूर्व, गौरव व्हॅली येथील आर्चीड बिल्डिंगमधील सी विंग रू. नं. ६०४ मध्ये रहणारे विक्रम शुक्ला यांची आई पुष्पा शुक्ला वय ७० वर्ष या एकट्याच घरी असताना दोन अनोळखी इसमांनी दाराची बेल वाजवून कुरियर आले आहे असे सांगून

उर्वरित पृष्ठ 2 वर

# मराठा आंदोलकांवरील सर्व किरकोळ गुन्हे मागे घेणार: मुख्यमंत्री



***मुंबई - मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या आंदोलक तरुणांवर दाखल करण्यात आलेले सर्व गुन्हे मागे घेण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. मात्र, आंदोलनादरम्यान ज्यांनी पोलिसांवर हल्ले केले आहेत अशांवरील गुन्हे मागे घेतले जाणार नाहीत, अशी ठाम भूमिका मुख्यमंत्र्यांनी घेतली आहे. मुख्यमंत्री आणि काही मराठा आदोलन समन्वयकांदरम्यानची बैठक संपल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी ही घोषणा केली.***



मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणारे आंदोलक तरुण हे आपलेच तरुण आहेत, हे लक्षात घेत त्यांच्यावरील गुन्हे मागे घेण्याचा सरकारने निर्णय घेतल्याचे सांगताना, पोलिसांवर हल्ले करणाऱ्या आंदोलकांवरील गुन्हे मागे घेतल्यास राज्यात चुकीचा संदेश जाईल आणि राज्यात आराजकाची स्थिती निर्माण होईल असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, अहवाल आल्यानंतर १ महिन्यात त्यावरील वैधानिक कारवाई पूर्ण केली जाईल. मला पूर्ण विश्वास आहे की सभागृह सकारात्मकपणे याचा विचार करेल. संपूर्ण सभागृह आरक्षणाच्या बाजूने आहे.

काही लोकांना चर्चेला नकार दिला, काही लोकांनी चर्चेला तयार आम्ही त्यांच्याशी चर्चा केली. ज्यांना चर्चा करावीसी वाटते त्यांच्याशी आम्ही चर्चा करू. सर्व संघटना एकाच दिशेने काम करत आहेत. कोणाचा मान अपमान करणार ही सरकारची भूमिका कधीच नाही.

**'आमदारांनी राजीनामे मागे घ्यावेत'**

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर राजीनामे देणाऱ्या आमदारांना ते न देण्याचे आवाहन करताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले की, आपल्याला सगळ्यांना मतदान करून समाजाला आरक्षण द्यायचे आहे. राजीनामा देऊन आरक्षणाला आपण मदत करू शकणार नाही. म्हणून भावनेच्या भरात राजीनामे देण्यापेक्षा सभागृहात हजर राहून मराठा समाजाच्या बाजूने मतदान करावे.

**'मेगा भरतीच्या नावाने अन्याय होऊ देणार नाही'**

राज्यात मेगा भरती करण्याची घोषणा राज्य सरकारने केली आहे. मात्र यात मराठा समाजावर अन्याय होईल अशी भावना मराठा समाजाच्या मनात निर्माण झाल्याचे आंदोलनाच्या समन्वयकांनी आजच्या बैठकीत मांडले. मात्र, मराठा समजाच्या तरुणांवर मेगा भरतीच्या नावाने अन्याय करणार नाही याची पूर्णपणे काळजी घेतली जाईल अशी घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली.

# मुंबईला महापुराचा धोका कायम!

**मुंबई :** शहर आणि उपनगरात कोसळत असलेल्या पावसाचे पाणी शोषून घेण्याची येथील जमिनीची क्षमता काँक्रिटीकरणामुळे संपुष्टात आली असून, भरावामुळे समुद्रात पाणी शिरण्याच्या मुखांमध्ये अडथळे येऊ लागले आहेत. परिणामी, भरतीदरम्यान वेळोवेळी मुंबई तुंबण्याच्या किंवा मुंबईत पूर येण्याच्या घटना सातत्याने घडत असून, येथे साचत असलेल्या पूराच्या पाण्याच्या निचरा करण्याचे मोठे आव्हान मुंबई महापालिका प्रशासनासमोर आहे.



महत्त्वाचे म्हणजे २६ जुलै २००५ रोजी मुंबईत पडलेल्या ९४४ मिलीमीटर पावसामुळे मुंबापुरी पाण्याखाली गेली होती. प्रत्यक्षात या घटनेनंतर महापालिकेने अद्यापही पाण्याचा निचरा होण्यासाठी अपेक्षित बदल केलेले नाहीत. परिणामी, ३०० मिलीमीटर पाऊस पडल्यानंतरही मुंबईचे जनजीवन विस्कळीत होत असून, महापूर नाही; पण येथील पूराचा धोका दिवसेंदिवस वाढतच आहे.

२६ जुलै २००५ च्या महापूराला आज १३ वर्षे पूर्ण होत असतानाच मागील कित्येक वर्षांत येथे पडलेल्या पावसाची नोंद ३०० मिलीमीटरहून अधिक झालेली नाही. मात्र, तरिही प्रत्येक पावसाळ्यात मुंबई पाण्याखाली जात असून, यास अनेक घटक कारणीभूत आहेत. सातत्याने येथे होत असलेल्या भरावांमुळे नव्या ठिकाणीही पावसाचे पाणी साचत असून, मुंबईला पूराच्या तडाख्यातून सोडविणे महापालिकेला नव्या यंत्रणाही राबवूनही जमलले नाही. विकसित देशांमध्ये मुसळधार पावसापासून शहराला वाचविण्यासाठी 'मायक्रो फ्लड मॉडेलिंग' सारखे प्रकल्प अंमलात येत आहेत. २६ जूलै २००५ च्या महापूरानंतर मुंबई शहरातही ज्या ज्या ठिकाणी पावसाळ्यात पाणी साचते तेथे 'मायक्रो फ्लड मॉडेलिंग' प्रकल्प आणावेत, अशी मागणी तज्ज्ञांनी पालिकेकडे केली.

मात्र पालिकेने याबाबत कोणतीही ठोस पावले उचलण्यात आली नाहीत. दरम्यान, नॅशनल एनव्हायरमेंटल इंजिनियरींग रिसर्च इन्स्टिट्यूटच्या म्हणण्यानुसार, पुरजन्य परिस्थितीतून बोध घेत पालिकेने मायक्रो फ्लड मॉडेलिंग प्रकल्प अंमलात आणणे गरजेचे आहे. पर्जन्य जल वाहिन्या सुधारण्यासह अद्ययावत करण्यासाठी पावले उचलणे आवश्यक आहे. संपुर्ण शहराचा, प्रामुख्याने सखल भागांचा अभ्यास करत पाणी साचले तर ते कसे बाहेर काढायचे? याबाबत विचार होणे गरजेचे आहे.

पावसाच्या साचत्या पाण्याचा धोका वाढतच असून, बीकेसी, ठाणे, भिवंडी, अॅन्टॉप हिल येथील परिसरांना महापूराचा अधिकच धोका असल्याचे सर्वेक्षणांतून समोर येते आहे. या ठिकाणांमध्ये मुंब्रा, कळवा, उल्हास नदी परिसर, ठाणे खाडीलगतच्या परिसराचाही समावेश आहे.

# भगवी वस्त्रं घालून हिमालयातही जा

## *उद्धव ठाकरेंना नारायण राणेंच्या 'शुभेच्छा'*

**मुंबई –** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि स्वाभिमानी पक्षाचे नेते नारायण राणे यांचे संबंध किती सलोख्याचे आहेत, हे महाराष्ट्राला सुपरिचितच आहे. एकमेकांवर टीकेचे बाण सोडताना आपण दोघांना पाहिलंय. पण, राणेंनी आज उद्धव ठाकरेंना ५८व्या वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. अर्थात, काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधींच्या शुभेच्छांपेक्षाही माझ्या शुभेच्छा जास्त महत्त्वाच्या आहेत, अशी कोपरखळी त्यांनी मारली. तसंच, उद्धव यांना हिमालयात जाण्याचाही खोचक सल्लाही त्यांनी दिला.

सकल मराठा समाजाचे आंदोलक आणि राज्य सरकार यांच्यात आता नारायण राणे शिष्टाई करणार आहेत. मराठा समाजाने आंदोलन थांबवल्यास सरकार तातडीने आरक्षण देईल, त्यासाठी आपण स्वतः मुख्यमंत्री आणि मराठा आंदोलकांमध्ये संवाद घडवून आणू, अशी भूमिका त्यांनी जाहीर केली. आंदोलकांनीही तुटेपर्यंत न ताणता, सरकारवर विश्वास ठेवावा,



असं आवाहनही त्यांनी केलं.

या पत्रकार परिषदेत, एका पत्रकाराने राणेंना उद्धव ठाकरेंच्या वाढदिवसाची आठवण करून दिली. तेव्हा, तुम्हा सगळ्यांच्या साक्षीने मी त्यांना शुभेच्छा देतो, असं राणे म्हणाले. मात्र, त्यांना टोला मारण्याची संधीही राणेंनी सोडली नाही. अयोध्येतील रामलल्लाचं दर्शन घेण्याची आणि वाराणसीला गंगा आरती करण्याची इच्छा उद्धव ठाकरे यांनी 'सामना'तील मॅरेथॉन मुलाखतीत बोलून दाखवली होती. तोच धागा पकडून, अयोध्या, वाराणसीच्या पुढे हिमालयही आहे, भगवी वस्त्रं घालून तिथे जायला हवं, असा टोमणा राणेंनी मारला. त्यावरून येत्या काळात राणे विरुद्ध शिवसेना यांच्यात शाब्दिक चकमक उडू शकते.

# घटनेत बदल करून मराठ्यांना आरक्षण द्या, आमचा पाठिंबा आहे - पवार

**कोल्हापूर - काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या सरकारने मराठा समाजाला आरक्षण दिले होते. मात्र, कोर्टाने ते आरक्षण रद्द केले. आता, राज्यात आणि केंद्रात भाजपचे सरकार आहे. त्यामुळे सरकारने घटनेत बदल करुन मराठा समाजाला आरक्षण द्यावं, त्यासाठी विरोधकांशी मी बोलेन आणि माझ्या पक्षाचा संपूर्ण पाठिंबा राहिल, असे शरद पवार यांनी कोल्हापुरात बोलताना म्हटले. तसेच १५ वर्षात आम्ही काय केलं यावर बोलताना, १५ वर्षात आम्ही आरक्षण दिले, असेही पवार म्हणाले.**

राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा आणि खासदार शरद पवार यांनी कोल्हापूर येथील कार्यक्रमात महसूलमंत्री चंद्रकांत पाटील आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर रेकॉर्डिंगच्या मुद्द्यावरुन शाब्दिक वार केले. सत्ताधाऱ्यांकडून करण्यात येणारे वक्तव्य हे आगीत तेल ओतणारे आहे. असे वक्तव्य करण्यापेक्षा त्यांनी रेकॉर्डिंग सादर करावे, असेही पवार म्हणाले. मराठा आरक्षणावर भाष्य करताना पवार यांनी फडणवीस सरकारलाही लक्ष्य केले. काँग्रेस-राष्ट्रवादी सरकारने मराठा आरक्षणाचा निर्णय घेतला. पण कोर्टात तो निर्णय रद्द झाला, तोपर्यंत आचारसंहिता लागली. त्यानंतर, भाजपचे सरकार आले. या सरकारनेही धनगर व मराठा समाजाला आरक्षण देण्यात येईल, असे अभिवचन दिले होते. ते आपले वचन पूर्ण करतील असे वाटत होते. पण तरुणांना काहीही न मिळाल्यामुळेच हे आंदोलन पेटल्याचे शरद पवार यांनी म्हटले. तसेच कायद्यात व राज्यात भाजपचे सरकार आहे. त्यांनी घटनेत किरकोळ बदल करून आरक्षणाचा निर्णय घ्यावा. याबाबत मी विरोधकाशी बोलेन,



त्याला आमच्या पक्षाचाही पाठिंबा असेल, असेही पवार यांनी म्हटले.

दरम्यान, चंद्रकांत पाटील यांच्या कोल्हापुरात पाटील यांना लक्ष्य करण्यासही ते विसरले नाहीत. शरद पवार यांनी १४ वेळा निवडणूक लढवली, पण चंद्रकांत पाटील यांनी जनतेतून निवडून यावे. त्यानंतर, निवडणूक आली की पवारांना जात आठवते, असे वक्तव्य करावे, असा टोलाही पवार यांनी चंद्रकांत पाटील यांना लगावला. तर सरकार जनतेपासून राफेल प्रकरणात काहीतरी महत्वाचं लपवतय, असा आरोपही त्यांनी केला.

# मुस्लीमांच्या वाढत्या लोकसंख्येमुळे बलात्कार व हत्यांमध्ये वाढ - भाजपा आमदार

मुस्लीमांच्या वाढत्या लोकसंख्येमुळे देशात दहशतवाद, बलात्कार व हत्यांची संख्या वाढत असल्याचा आरोप भाजपाच्या एका आमदारानं केला आहे. उत्तर प्रदेशातल्या फैजाबादमधल्या आंबेडकरनगरचे आमदार हरी ओम पांडे यांनी पत्रकारांशी बोलताना दावा केला की जर मुस्लीमांच्या लोकसंख्येवर नियंत्रण राखण्यात सरकारला अपयश आलं तर पाकिस्तानसारखा आणखी एक देश तयार होईल आणि देशामध्ये अराजक नांदेल.




'मुस्लीमांच्या वाढत्या लोकसंख्येमुळे दहशतवाद, बलात्कार व हत्यांचं प्रमाण वाढत आहे. स्वातंत्र्यानंतर देशातील मुस्लीमांच्या संख्येत विलक्षण वाढ झाली आहे,' पत्रकारांशी बोलताना पांडे म्हणाले. मुस्लीम तीन – चार विवाह करतात, ९-१० मुलांना जन्माला घालतात ज्यांना शिक्षण मिळत नाही व ते शेवटी बेरोजगार राहतात. परिणामी देशात अराजक निर्माण होईल. आता शरीया कायद्याची मागणी होत असून नंतर पाकिस्तानची मागणी करण्यात येईल,' पांडे म्हणाले.

लोकसंख्या नियंत्रणात आणण्यासंदर्भात संसदेत विधेयक आणायला हवं अशी मागणी पांडे यांनी केली असून जर देश वाचवायचा असेल तर असं विधेयक संसदेत मंजूर होणं आवश्यक असल्याचे ते म्हणाले. पांडे यांना चार मुलं असून त्यांनी बसपाच्या राकेश पांडे यांचा सव्वा लाख मतांच्या फरकानं आंबेडकरनगर मतदारसंघात पराभव केला होता.

# 'पुणे, मुंबईमध्ये बहुमजली इमारतींना परवानगी नको'

**मुंबई :** गेल्या काही वर्षापासून मुंबई पाठोपाठ पुणे शहरातदेखील बहुमजली इमारत बांधण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे. परंतु सध्या बहुमजली इमारतीसाठी आवश्यक असलेल्या फायर सिस्टीम अद्याप आपल्याकडे विकसित झालेले नसल्याचे मुंबईत नुकत्याच लागलेल्या बहुमजली इमारतीवरून स्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर शहराचा विकास आराखडा मंजूर करण्याचा मुद्दा महत्त्वाचा असून, नियोजनबद्ध विकासासाठी बहुमजली इमारतींना परवानगी देण्यात येऊ नये, अशी मागणी नुकत्याच पार पडलेल्या पावसाळी अधिवेशनात केली असल्याची माहिती विधान परिषदेचे आमदार अनंत गाडगीळ यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पुणे शहरातील वाढती प्रदूषण पातळीसंदर्भात विधान परिषदेत लक्षवेधी मांडल्यानंतर राज्याचे पर्यावरणमंत्री रामदास कदम यांनी परिवहनमंत्री दिवाकर रावते यांच्यासमवेत बैठक घेण्याचे आश्वासन सभागृहात दिले.

तसेच महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे (महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल) बनावट पदव्या घेऊन डॉक्टर प्रॅक्टिस करीत असल्याच्या १४ तक्रारी आल्याचे सरकारने सांगितले आहे. त्यावरील प्रश्नानंतर ५३ बनावट डॉक्टरांचे परवाने रद्द केल्याचे वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले. पुण्यातील मुजुमदार वाड्याच्या दुरुस्तीसाठी आमदार निधीतून १० लाख रुपये दिले असून, महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्यासमवेत यासंदर्भात बैठक होणार असल्याचे देखील गाडगीळ यांनी या वेळी सांगितले.



# मेल-एक्स्प्रेस प्रवाशांसाठीही आता कागदविरहीत तिकीट

मध्य व पश्चिम रेल्वेवरील लोकल प्रवाशांसाठी कागदविरहीत (पेपरलेस) तिकीट सुविधा उपलब्ध केल्यानंतर आता मेल-एक्स्प्रेस गाड्यांच्या प्रवाशांसाठीदेखील ही सुविधा लवकरच उपलब्ध केली जाणार आहे. यावर रेल्वेच्या क्रिस संस्थेकडून (सेंटर फॉर रेल्वे इन्फॉर्मेशन सिस्टिम) चाचणी सुरू आहे. त्यामुळे तिकिटाची प्रत जवळ बाळगण्यामधून प्रवाशांची सुटका होऊ शकेल.

तिकिटांच्या रांगेतून प्रवाशांची सुटका करण्यासाठी रेल्वेच्या 'क्रिस'ने मोबाईल तिकिटाची संकल्पना आणली. २०१५ मध्ये प्रथम कागदविरहीत (पेपरलेस) तिकीट सुविधा प्रवाशांसाठी उपलब्ध केली. जीपीएसद्वारे सेवा उपलब्ध होत असली तरी त्यात तांत्रिक अडचणींचा सामना प्रवाशांना करावा लागत होता. त्यामुळे प्रवाशांसाठी मोबाईलवर तिकिटाची माहिती येताच स्थानकात जाऊन एटीव्हीएममधून कागदी तिकीट मिळवण्याचा पर्यायही दिला. कालांतराने जीपीएसमध्ये येणारा तांत्रिक अडथळा दूर करुन कागदविरहीत तिकीट सुविधा प्रवाशांना चांगल्यातऱ्हेने देण्यास सुरुवात झाली. सध्या मोबाईल तिकिट सेवेला प्रवाशांचा प्रतिसाद वाढत



असल्याने मेल-एक्सप्रेस प्रवाशांसाठीही कागदविरहीत तिकीट सुविधा देण्याचा निर्णय घेतला आहे.

मोबाइलवर मेल-एक्स्प्रेसचे तिकीट काढताच प्रवाशांना त्यावर तिकीट उपलब्ध होईल. तिकीट तपासनीसाला मोबाइलवरीलच तिकीट दाखवून प्रवास करणे शक्य होणार आहे. त्यामुळे तिकिटाची प्रत जवळ बाळगण्याच्या कटकटीतून प्रवाशांची सुटका होणार आहे. 'क्रिस'ने त्याची चाचणी केल्यानंतर आता मध्य व पश्चिम रेल्वेला त्याची चाचणी करण्यास सांगितले आहे. दोन्ही रेल्वे विभागाकडून चाचणीचा अहवाल प्राप्त होताच पश्चिम व मध्य रेल्वेवरील मेल-एक्स्प्रेस प्रवाशांना ही सुविधा दिली जाईल.

# आराखड्याचा 'विकास' मुंबईकरांच्या हातात

**मुंबई :** मंजूर विकास आराखडा-२०३४ आणि विकास नियंत्रण व प्रोत्साहक नियमावली २०३४ या अनुषंगाने राज्य शासनाद्वारे महानगरपालिकेस प्राप्त नकाशे जनतेच्या माहितीसाठी व अवलोकनार्थ संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यामध्ये शहरी भाग, पूर्व उपनगरे व पश्चिम उपनगरे या तिन्ही भागांच्या नकाशांचा समावेश आहे. आराखड्यातील बदलांच्या नकाशांबाबत सूचना व हरकती या राज्य शासनाच्या अखत्यारितील नगररचना खात्याच्या उपसंचालकांकडे नोंदवायच्या आहेत, त्यामुळे आता या आराखड्याचा विकास मुंबईकरांच्या हाती आहे.

महापालिकेच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आलेल्या शहर भागाशी संबंधित नकाशांवर सूचना व हरकती नोंदविण्यासाठी ५ ऑगस्ट ही अंतिम मुदत आहे. पश्चिम उपनगरांसाठी १६ ऑगस्ट अंतिम तारीख आहे. नुकत्याच अपलोड करण्यात आलेल्या पूर्व उपनगरांच्या नकाशांसाठी २५ ऑगस्ट अंतिम मुदत आहे. महापालिकेच्या विकास नियोजन खात्याचे प्रमुख अभियंता संजय दराडे यांनी याबाबत सांगितले की, मुंबई शहर व उपनगरांचा विकास आराखडा (२०३४), विकास नियंत्रण व प्रोत्साहक नियमावली (२०३४) यास ८ मे २०१८ रोजीच्या शासनाच्या अधिसूचनेद्वारे सारभूत स्वरूपाचे बदल वगळून मंजुरी देण्यात आली आहे.

या संदर्भातील अधिसूचना १३ -२३ मे २०१८ च्या शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे. आराखड्यातील फेरबदलांच्या अनुषंगाने सूचना व हरकती मागविण्यात आल्या आहेत. शासनाच्या नगरविकास विभागाने ८ मे २०१८ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अधिसूचनेबाबत २२ जून २०१८ रोजी शुद्धीपत्रक निर्गमित केले आहे. त्यानुसार सदर आराखड्यातील मंजूर भाग १ सप्टेंबर २०१८ पासून अमलात येईल.

# रेल्वे स्थानकावर प्रवाशांना लुटणारी टोळी जेरबंद

**मुंबई -** मुंबईच्या रेल्वे स्थानकांवर नाना तऱ्हेच्या शकला लढवून प्रवाशांना लुटणाऱ्या सराईत आरोपींच्या टोळीचा कुर्ला रेल्वे पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. कधी पैसे खाली पडले असल्याचे नाटक करून तर कधी मोबाइल हिसकावून, तर कधी चाकूचा धाक दाखवून हे चोरटे विविध स्थानकांवर नागरिकांना लक्ष करून लुटायचे. मुंबईच्या कुर्ला रेल्वे टर्मिनल्सवर गावाकडे जाणाऱ्या प्रवाशांची कायमच वरदळ असते. त्यामुळे घाईगडबडित असलेल्या प्रवाशांना पैस पडले असल्याची बतावणी करून त्याचे लक्ष विचलीत झाल्यावर प्रवाशांचे सामान चोरणारी टोळी कार्यरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या प्रकारचे गुन्हे ही दिवसेंदिवस वाढत होते. ११ जुलै रोजी गावी निघालेल्या दिपा मेहतानी यांना तीन चोरट्यांनी पैसे खाली पडले असल्याचे सांगून लक्ष विचलीत करून त्याची बॅग चोरली. या बॅगेत दिपा यांचे १३ लाख रुपयांचे सोने होते. या गुन्ह्यांचा तपास करताना पोलिसांनी आरोपींची ओळख पटवण्यासाठी शेकडो सीसीटिव्ही तपासले. अखेर आरोपींची ओळख पटल्यानंतर ही टोळी वांद्रे टर्मिनल्स येथे येणार असल्याची माहिती मिळाली.

# वृद्ध महिलेस चाकूचा धाक दाखवून जबरी चोरी करणारे गुन्हेगार अटक

**(पान १ वरुन)** श्रीमती पुष्पा शुक्ला यांनी दरवाजा उघडताच त्यांना चाकूचा धाक दाखवून त्यांचे हात पाय बांधून तोंडास चिकटपट्टी लावून बेडरूममधील लॉकरमध्ये ठेवलेल्या सोन्या-चांदीचे दागिने, घड्याळे व रोख रक्कम अशा एकूण ३,३५,०००/- रुपयाचा ऐवज जबरीने चोरी करून चोरून नेले याबाबत विक्रम शुक्ला यांनी फिर्याद दिल्याने काशिमीरा पोलिस ठाण्यात गुरनं. ४८४/२०१८, भादविसक्र ३९२, ४५२, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरूपाचा असल्याने ठाणे ग्रामीणचे प्रभारी पोलिस अधिक्षक श्री. प्रशांत कदम, यांनी गुन्हा उघडकीस आणणे कामी वेगवेगळी पथके तयार केली होती. स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी गुन्ह्याचा समांतर तपास करून उपलब्ध सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक विश्लेषनाच्या आधारे अविनाशकुमार शुक्ला, देवेंद्र उर्फ दिपेश भगवान अटके या आरोपींना ताब्यात घेतले. यांच्याकडून कौशल्यपूर्वक विचारपूस करून गुन्ह्यातील चोरलेले १३.४ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने, चांदीचे पैंजन, जोडवे, घड्याळे व १३,०००/- रुपये रोख रक्कम असा एकूण २,६७,००० रुपयांचा ऐवज तसेच गुन्हा करण्यासाठी वापरलेला चाकू हस्तगत करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचा तपास डॉ. महेश पाटील पोलिस अधिक्षक, श्री प्रशांत कदम, मा. प्रभारी पोलिस अधिक्षक आणि व्यंकट आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

उपरोक्त गुन्ह्याचा पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखेमार्फत करण्यात येत असून अशाच प्रकारे घडलेले इतरही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. आरोपीत हे १-८-२०१८ पर्यंत पोलिस कस्टडीत आहेत.

## संपादकीय...

# व्यापक लढाईची तयारी



संपादक:-
दिपक मोरेश्वर नाईक

मराठा समाजाच्या मागण्यांसाठी चाललेले राज्यव्यापी आंदोलन आता नव्या टप्प्यावर येऊन पोहोचले आहे. आधी महाराष्ट्र बंद झाला. त्यानंतर मुंबई आणि परिसर बंद झाला. मराठा समाजाने उत्स्फूर्तपणे जे लाखालाखांचे मोर्चे याआधी राज्यभरात काढले, ते मोर्चे म्हणजे शांततामय लोक आंदोलन कसे असते, याचा आदर्श नमुना होता. या ५८ मोर्च्यांनी साऱ्या जगापुढे एक आदर्श ठेवला होता. आता ठोक मोर्चा आणि 'बंद'च्या निमित्ताने आंदोलनाचा दुसरा टप्पा सुरू झाला आहे.

क्रांतिदिनी म्हणजे नऊ ऑगस्टला तिसरा टप्पा सुरू करण्याचेही ठरत आहे. या साऱ्या आंदोलनाची सर्वांत महत्त्वाची मागणी आरक्षणाची आहे आणि ते सध्या न्यायालयीन निकालाच्या प्रतीक्षेत आहे. भारतीय घटनाकारांनी आरक्षणाची टक्केवारी ठरवून दिली. ती पन्नास टक्के आहे. मराठा समाजाची मागणी १६ टक्क्यांची आहे. ती मंजूर झाल्यावर एकूण आरक्षण ६८ टक्क्यांपर्यंत जाईल. इतर मागासवर्ग म्हणजे ओबीसींसाठी असणाऱ्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण



द्यायला हवे आणि ते देण्यासाठी घटनादुरुस्तीचा मार्गही चोखाळता येतो का, हे पाहायला हवे. जयललिता मुख्यमंत्री असताना तामिळनाडूत आरक्षणाची टक्केवारी ६९ पर्यंत नेली. आजही ती आहेच. तेव्हा अशी टक्केवारी वाढली तरी काही बिघडत नाही. राज्य सरकारलाही हे मान्य आहे. आज प्रश्न केवळ आरक्षणाचा नाही. मराठा समाज हा महाराष्ट्रातला प्रमुख कृषक समाज आहे आणि शेती तसेच दुधासारखे इतर पूरक कृषिउद्योग सतत संकटात सापडत आहेत. यंदा उत्तम पाऊस होत असल्याने उद्या साखर कारखान्यांमधून विक्रमी साखर निघणार आणि ते एक नवे संकट कोसळणार आहे. मराठा समाजातील खदखद ही अशी बहुपदरी, बहुआयामी आहे. ती तशी समजावून घेऊन तिला उमद्या मनाने सामोरे गेल्याशिवाय तिचा दाह समजणार नाही. अन्यथा, आत्महत्या केलेले सर्वाधिक शेतकरी हे 'मराठा' समाजाचे आहेत, हे आंदोलकांना वारंवार का सांगावे लागले असते? आता मराठा आंदोलकांना शांततेचे आवाहन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ६०२ अभ्यासक्रमांतील दोन लाख मुलांना शैक्षणिक शुल्काचा ५० टक्के परतावा मिळाल्याचे म्हटले आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यात होणाऱ्या वसतिगृहांपैकी दोन पुरी होत आल्याचेही नमूद केले आहे. तरुण उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी अण्णासाहेब पाटील महामंडळही काम करीत आहे. मुख्यमंत्र्यांनी उल्लेख केलेली ही व इतर अपेक्षित कामे सरकारकडून कार्यक्षमतेने करून घेण्यासाठी 'मराठा क्रांती मोर्चा'ने कायमस्वरुपी खंबीर व्यवस्था निर्माण करायला हवी. या व्यवस्थेचा सातत्याने विधायक दबाव प्रशासनावर ठेवायला हवा. मुख्यमंत्र्यांचे निवेदन आले असताना मराठा समाजातील मान्यवरांनी अतिशय समतोल व दूरदृष्टीचे निवेदन काढले आहे. या दोन्ही निवेदनांचे सर्वांनी कृतिशील स्वागत करायला हवे. एन. डी. पाटील, न्यायमूर्ती बी. एन. देशमुख यांनी 'शिवरायांच्या मावळ्यांना' हाक घालताना आत्महत्या किंवा जलसमाधीचा मार्ग न पत्करता सनदशीर मार्गाने लढा चालू ठेवण्याचे आवाहन केले आहे. या विचारवंतांनी 'सरकार आंदोलकांच्या भावना समजावून घेण्यात कमी पडत असले तरी केवळ भावनिक व हिंसक आंदोलन हिताचे ठरणार नाही,' असाही प्रेमाचा इशारा समाजाला दिला आहे. तो अतिशय महत्त्वाचा आहे. याचे कारण, कोणतेही आंदोलन भरकटले किंवा त्याला हिंसेचे गालबोट लागले तर ते मोडून काढणे सोपे जाते. अजेंडा भलतीकडे सरकतो आणि मूळ मुद्दे बाजूला जातात किंवा ते दूर सारणे शक्य होते. तसे होता कामा नये. इतर समाजांप्रमाणेच मराठा समाज हाही एकाश्म नाही. संयुक्त महाराष्ट्रानंतर राजकीय किंवा सहकारी चळवळीतील सहभागामुळे लाभ मिळालेले जसे अनेक आहेत तसेच आजही निव्वळ मोलमजुरी करावी लागत असल्याने हातावर पोट असणारेही लक्षावधी मराठा आहेत. या वंचित मराठा समाजबद्दलचा इतर साऱ्या समाजांचा बंधुभाव जागा व जागता करणे, हेही महाराष्ट्राच्या नेत्यांचे काम आहे. एखाद्या समूहाने निर्धारच केला तर एक-दोन पिढ्यांमध्ये सारे चित्र पालटून टाकता येते. राजर्षि शाहू, विठ्ठल रामजी शिंदे, यशवंतराव चव्हाण यांचा आदर्श ठेवला तर असे चित्र पालटणे मुळीच अवघड नाही. महाराष्ट्रातला मराठा समाज आता खडबडून जागा झाला आहे. त्याने आता हे जनआंदोलन समाजाच्या सर्व प्रश्नांना सखोल व समग्रपणे भिडवून स्थित्यंतराची दीर्घकालीन व सर्जक लढाई तयारीने छेडावी. ती छेडण्यात ज्यांचे अडथळे होत असतील ते मात्र कटाक्षाने व कठोरपणे दूर करावेत.




***ज्येष्ठ नागरिक धोरणांत सामाजिक सुरक्षेचा विषय सोडून इतर बाबींवरच भर दिलेला आहे. धोरण राबवण्यासाठी प्रत्येक विभागाने त्यांच्याकडे असलेल्या निधीतूनच जबाबदाऱ्या पार पाडाव्यात, असे आदेश आहेत. म्हणजे सध्या जी स्थिती आहे त्यामध्ये फार काही सुधारणा होण्याची अपेक्षाच करता येत नाही...***

महाराष्ट्र सरकारनाने ज्येष्ठ नागरिकांना विविध सोयी-सवलती जाहीर करण्यासाठी अलिकडेच काढलेल्या शासकीय आदेशात आणि घोषणेतही काही नवीन नाही. ज्येष्ठांच्या समस्या किती विविध प्रकारच्या आहेत याचेही भान यात नाही. आधीच्या सरकारांनी वेळोवेळी घेतलेल्या भूमिका, जाहीर केलेले धोरण आणि आताचे धोरण यातही गुणात्मकदृष्ट्या काही विशेष फरक नाही.

भारतातील व महाराष्ट्रातील ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या खूप वेगवेगळ्या आहेत आणि त्यांचे विविध स्तरही आहेत. त्या सर्वांना सामावून घेणारे धोरण खरेतर हवे होते. ग्रामीण, आदिवासी, नागरी, अर्धनागरी, दारिद्र्यरेषेखालील, मध्यमवर्गीय आणि सुस्थितीतील असे ते विविध स्तर आहेत. पेन्शनर म्हणजे निवृत्तिवेतनधारकांमध्येही सुशिक्षित, अशिक्षित व थोडे सुशिक्षित आहेत. वयोमानानुसार तरुण, ज्येष्ठ, तसेच अती ज्येष्ठ म्हणजे वय वर्षे ८० हून अधिक असेही आहेत. ज्येष्ठ नागरिकांत महिलांचे प्रमाण थोडे अधिक असून महिला ५२ टक्के तर पुरुष ४८ टक्के आहेत. पण त्यांच्यापैकी ५० टक्क्यांपेक्षाही जास्त महिला एकट्या (विधवा) आहेत. ज्येष्ठ महिला बहुसंख्य अशिक्षित व आर्थिकदृष्ट्या परावलंबी आहेत. बरेचसे ज्येष्ठ नागरिक कुटुंबात राहणारे आहेत व तरीही एकटे राहणारांचे प्रमाण ४० टक्के आहे. या सगळ्यांच्या गरजा व अपेक्षा निरनिराळ्या आहेत. मुख्य समस्या आहेत, आर्थिक सुरक्षा, आरोग्य सुरक्षा, जीवित व मालमत्तेची सुरक्षा आणि घरगुती किंवा बाहेरच्या छळापासून सुरक्षा.

भारतीय घटनेच्या कलम ३९ व ४१ अनुसार ज्येष्ठ नागरिकांना उतारवयात मानाने जगण्यासाठी आवश्यक अशा तरतुदी सरकारने म्हणजे केंद्र शासन, राज्य शासन व स्थानिक स्वराज्य संस्था यांनी कराव्यात, असे अपेक्षित आहे. १९८२मध्ये व्हिएन्ना येथे यूनोच्या पहिल्या 'जागतिक वयोवर्धन परिषदे'त सर्व देशांनी आपली ज्येष्ठ नागरिक धोरण जाहीर करून ते अंमलात आणावे, असा धरण्यात आला होता. महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. आर. एम. भट या परिषदेला प्रतिनिधी म्हणून हजर होते. परिषदेवरून परत आल्यानंतर त्यांनी अन्य संघटनासह केंद्र सरकारला भारताचे राष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक धोरण जाहीर करण्याचा आग्रह धरला व शेवटी जानेवारी १९९९मध्ये तेव्हाचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी 'राष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक धोरण' जाहीर केले. त्याच धर्तीवर भारतातील सर्व राज्यांनी आपले धोरण जाहीर करावे, अशी केंद्र सरकारची सूचना होती. त्यानुसार महाराष्ट्राचे धोरण तयार करण्यासाठी महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ, अखिल भारतीय ज्येष्ठ नागरिक महासंघ व आंतरराष्ट्रीय दीर्घायू केंद्र यांनी पुढाकार घेतला व पुण्याला 'यशदा'मध्ये अनेक सभा आयोजित केल्या. धोरणाचे प्रारूप तयार करून केंद्र सरकारचे निवृत्त मंत्रिमंडळ सचिव बी. जी. देशमुख यांच्या पुढाकाराखाली हे धोरण मुख्यमंत्र्यांना २००२ मध्ये सादर करण्यात आले.

सुशीलकुमार शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांनी या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी खूप खर्च येईल, असे सांगत १४ जून, २००४ रोजी दोन पानांचे महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक धोरण; अखर्चिक बाबींचे जाहीर केले. सर्व संघटनांनी त्याला विरोध केला. अनेक नेत्यांच्या भेटीही घेतल्या. परंतु संघटनांनी सादर केलेला मसुदा बाजूला ठेवून, सरकारच्या विविध विभागांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी काय करावे, अशा सूचना देणारी एक सूची सामाजिक न्याय विभागाने बनवली व तेच ज्येष्ठ नागरिक धोरण म्हणून ३० सप्टेंबर, २०१३ रोजी जाहीर केले.

महाराष्ट्रातील १ कोटी २२ लाख ज्येष्ठ नागरिकांच्या ४ हजार ५०० हून अधिक संस्था आहेत. ज्येष्ठांचे धोरण ठरवण्याबाबत व जाहीर करण्याबाबत गेल्या १८ वर्षांपासून त्या सर्वांनी आजवर भरपूर प्रयत्न व पत्रव्यवहार केले. आंदोलनेही झाली. परंतु अद्याप महाराष्ट्र सरकारने सर्वसमावेक्षक 'ज्येष्ठ नागरिक धोरण' जाहीर केले नसून केवळ मंत्रिमंडळ निर्णय झाला आहे. ज्येष्ठांसाठी संसदेने मंजूर केलेल्या 'आई-वडील व ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याण अधिनियम २००७' तसेच संयुक्त राष्ट्रसंघाने ज्येष्ठांची केलेली व्याख्या बाजूला सारून, ज्येष्ठांचे वय ६० वर्षांऐवजी ६५ वर्ष करण्यात आले होते. ते आता पुन्हा ६० करण्यात आले, हे स्वागतार्ह आहे.


आताचे निर्णय पाहिल्यास आपणास असे दिसेल की ज्येष्ठ नागरिकांसाठी सर्वांत महत्त्वाचा असलेला सामाजिक सुरक्षेचा विषय सोडून इतर बाबींवर भर दिला आहे. धर्मादाय संस्था, स्वयंसेवी संस्था, सेवाभावी संस्था, खासगी वैद्यकीय सुविधा देणाऱ्या संस्था, खासगी वैद्यकीय सुविधा देणारे डॉक्टर, महापालिका, नगरपरिषद, नगरपालिका, नगरपंचायती, स्थानिक स्वराज्य संस्था, विद्यापीठे, ग्रंथालय, संशोधन संस्था, बिगरसरकारी संस्था, खासगी क्षेत्रातील व अशासकीय संघटना, बार असोसिएशन, गृहनिर्माण संस्था व खासगी बिल्डर्स यांच्या भरवशावर ज्येष्ठांसाठी सोयी, सुविधा देण्याचा प्रयत्न या आदेशाद्वारे करण्यात येत असल्याचे दिसते. स्वतः सरकार मात्र काही करू इच्छित नाही. अर्थात, हे गेल्या चार वर्षांत त्यांच्या ज्येष्ठांप्रती जी निष्क्रियता दिसली त्यावरूनही हे स्पष्ट होतेच. राज्य शासनाच्या वेगवेगळ्या विभागांवर सर्वसमावेशक ज्येष्ठ नागरिक धोरण राबवण्यासाठी सोपविलेल्या जबाबदाऱ्या प्रत्येक विभागाने त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या निधीतून पार पाडाव्यात असे आदेश आहेत. म्हणजे सध्या जी स्थिती आहे तीत फार सुधारणा होण्याची अपेक्षाच करता येत नाही.

ज्येष्ठ महिलांमध्ये सुमारे ५० टक्क्यांपेक्षा जास्त विधवा असतात. अनेकदा त्यांच्या नावावर काही संपत्ती नसते अथवा पैसाही नसतो. अशा ज्येष्ठ महिलांसाठी प्रस्तावित केलेल्या बाबींचा महाराष्ट्र सरकारच्या कार्यवाहीमध्ये कुठे उल्लेखही नाही. महाराष्ट्रातील ज्येष्ठ नागरिकांपैकी ७२ टक्के ज्येष्ठ नागरिक ग्रामीण भागात राहतात. ग्रामीण भागात तरुणांना नोकरी-व्यवसायासाठी वाव नसल्यामुळे ते आई-वडिलांना सोडून शहराकडे अथवा परदेशात जातात. जाताना घरातला पैसा घेऊन अथवा प्रॉपर्टी विकून ज्येष्ठांना निराधार करून कुंभमेळा, रुग्णालये अथवा शहरांच्या रेल्वे स्टेशनांवर सोडून देतात, असे अनेकदा दिसते.

ज्येष्ठांचे प्रश्न व चिंता ही देशाची चिंता समजली जाईल, ज्येष्ठांना असंरक्षित, दुर्लक्षित अथवा गौण परिस्थितीत राहू न देता सुखाचे व आनंदाचे जीवन देण्याचे आश्वासन राष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक धोरणा अंतर्गत (१९९९) दिले होते. सरकारचे ज्येष्ठ नागरिक धोरण व अंमलबजावणीही त्याच धर्तीवर असेल अशी अपेक्षा होती. इतर राज्यामध्ये ज्येष्ठ नागरिकांना सामाजिक सुरक्षेअंतर्गत देण्यात येत असलेले निवृत्तिवेतन केंद्र सरकारने मंजूर केल्यापेक्षा अनेक पटीने जास्त आहे व त्याचा लाभही लाखो लोक घेत आहेत. उदाहरणार्थ, आंध्र प्रदेश, हरयाणा आणि दिल्ली. या राज्यांमध्ये ज्येष्ठांना १८०० ते २००० रूपये महिना पेन्शन मिळते. महाराष्ट्रात मात्र ६०० रुपये मिळतात आणि लाभार्थींची संख्याही कितीतरी कमी आहे. एकंदर राज्य सरकारकडून पुन्हा एकदा ज्येष्ठांच्या तोंडाला पानेच पुसण्यात आली आहेत. गेल्या चार वर्षांत ज्येष्ठांसाठी सुविधा व सोयी देण्यासाठी अथवा सामाजिक सुरक्षेचा एकही निर्णय घेतलेला नाही. यावरून शासनाच्या ताज्या निर्णयाची अंमलबजावणी कशी होईल, याची कल्पना येईल. ज्येष्ठ नागरिकही मतदान करतात, हे सर्वच राजकीय पक्षांनी लक्षात ठेवावे, हेच बरे.

# ठाणे शहरात साथीच्या आजारांचा फैलाव

**ठाणे–** जूनच्या शेवटच्या आठवड्यापासून ठाणे शहरात सुरू असलेल्या पावसाबरोबर आता साथीच्या आजारांचीही सुरुवात झाली आहे. मलेरिया, डेंग्यू, अतिसार, जुलाब, विषमज्वर, लेप्टोस्पायरोसिस, कावीळ यांसारख्या आजारांनी ग्रासलेल्या तब्बल ८१४ रुग्णांची गेल्या दोन महिन्यांत नोंद झाली आहे. जूनच्या तुलनेत जुलैमध्ये आढळलेल्या रुग्णांची संख्या जास्त असून अतिसाराची बाधा झालेल्या रुग्णांची संख्या साडेचारशेवर पोहोचली आहे. असे असले तरी, प्रतिबंधात्मक उपाययोजनांमुळे या आजारांच्या फैलावावर नियंत्रण आणल्याचा दावा पालिकेच्या आरोग्य विभागाने केला आहे.



ठाणे महापालिका क्षेत्रात गेल्या दोन महिन्यांपासून सतत पाऊस पडत असला तरी गेल्या १५ दिवसांपासून पाऊस अधूनमधून हजेरी लावत आहे. ऊन आणि पाऊस असे मिश्र वातावरण असल्याने या वातावरणबदलामुळे शहरात साथीच्या आजारांनी डोके वर काढण्यास सुरुवात केली आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागाकडे नोंद झालेल्या आकडेवारीनुसार गेल्या महिनाभरात विविध आजारांचे ५०८ रुग्ण आढळले आहेत. तर गेल्या दोन महिन्यांत अतिसाराचे ४५३ रुग्ण, मलेरियाचे १०९ रुग्ण, जुलाबाचे ७० रुग्ण, विषमज्वरचे १५ रुग्ण, कावीळचे ४ रुग्ण, लेप्टोस्पायरोसिसचे २ रुग्ण आढळून आले आहेत.

शहरात डेंग्यूचे १६१ संशयित रुग्ण आढळून आले असून त्यापैकी १७ जणांना डेंग्यूची लागण झाल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र या आजारांमुळे एकही रुग्ण दगावलेला नसल्याचे आकडेवारीतून दिसून येते. तसेच कॉलरा, गॅस्ट्रो, स्वाइन फ्ल्यू आणि चिकण गुनिया या आजारांचा एकही रुग्ण आढळून आलेला नाही, अशी माहिती पालिकेच्या आरोग्य विभागाने दिली आहे. पावसाळ्याच्या काळात साथीच्या आजारांचा फैलाव होऊ नये म्हणून शहरात विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. त्यामुळेच साथीचे आजार आटोक्यात असून त्याचबरोबर एकही रुग्ण दगावलेला नाही, असा दावा महापालिकेचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आर. टी. केंद्रे यांनी केला. महापालिका रुग्णालयांसोबत शहरातील खासगी रुग्णालयांमधील रुग्णांचा आढावा घेऊनच ही आकडेवारी जाहीर करण्यात आली आहे, असेही केंद्रे यांनी सांगितले. पाऊस थांबल्यावर डेंग्यू, मलेरियाच्या रुग्णांमध्ये वाढ होते, असा सर्वसाधारण अनुभव आहे. हे लक्षात घेऊन डास प्रतिबंधक उपाययोजना मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात आली आहे, असेही आरोग्य विभागाने स्पष्ट केले.

# पोलिसांच्या गाडीवर खाजगी वाहनचालक?

**मुरबाड-** कल्याण-नगर राष्ट्रीय महामार्ग ६१ हा मुरबाड तालुक्यातून जातो. या मार्गावर माळशेज घाट तसेच महामार्गावरील वेड्यावाकड्या वळणामुळे होणारे अपघात तसेच अवैध वाहतुकीला पायबंद घालण्यासाठी उमरोली येथे स्वतंत्र महामार्ग पोलीस ठाणे सुरू करण्यात आले. या पोलीस ठाण्याला स्वतंत्र वाहनव्यवस्था शासनाने उपलब्ध करून दिली आहे. मात्र, ही वाहने खाजगी वाहनचालक हाकतात.

मुरबाड तालुक्यातील कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी ब्रिटिशांच्या राजवटीत मुरबाड शहरात पोलीस ठाणे सुरू करण्यात आले. त्यांनी बांधकाम केलेल्या इमारतीतून आजही पोलिसांचा कारभार सुरू आहे. मात्र, कालांतराने वाढलेली तालुक्याची लोकसंख्या, तालुक्यातून गेलेला कल्याण-नगर राष्ट्रीय महामार्ग, या महामार्गावर होणारे अपघात, शिवाय या मार्गाचा गुन्हेगारीसाठी होणारा दुरु पयोग रोखण्यासाठी १० वर्षांपूर्वी टोकावडे येथे स्वतंत्र पोलीस ठाणे करण्यात आले. राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक दिवसेंदिवस वाढत गेल्याने उमरोली येथे महामार्ग पोलीस ठाणे निर्माण करण्यात आले. टोकावडे तसेच उमरोली पोलीस ठाण्यांना शासनाने स्वतंत्र वाहने उपलब्ध करून दिली आहेत. मात्र, वाहनचालक न दिल्याने येथील पोलीस अधिकाऱ्यांना खाजगी चालक ठेवावे लागतात. मात्र, यामुळे गोपनीयतेच्या नियमांचा भंग होऊ शकतात.

काही वेळा महत्त्वाच्या गुन्ह्यांतील आरोपी पकडायचे असतील, तर यासाठी वर्दीतील चालकच असणे



आवश्यक असते. या चालकांनी गोपनीयतेची शपथ घेतलेली असते. मात्र, खाजगी चालकांवर कोणतेही बंधन किंवा जबाबदारी नसल्याने पोलिसांकडून होणारी कारवाई उघड होण्याची शक्यता असते. हे टळावे, यासाठी शासनाने टोकावडे पोलीस आणि उमरोली महामार्ग पोलिसांना शासकीय चालक उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी काही पोलिसांनीच नाव न छापण्याच्या अटीवर केली आहे.

# सिडकोच्या गृहनिर्माण योजनेतील शिल्लक घरांची लवकरच विक्री

**नवी मुंबई :** विविध कारणांमुळे नव्या आणि जुन्या गृहनिर्माण योजनेत विक्रीविना पडून असलेल्या सदनिका आणि व्यावसायिक गाळ्यांची सध्याच्या दराने विक्री करण्याचा निर्णय सिडकोने घेतला आहे. त्यासाठी लवकरच अर्ज विक्री केली जाणार आहे. त्यादृष्टीने सिडकोच्या संबंधित विभागाने कार्यवाही सुरू केली आहे.



नवी मुंबई शहराची निर्मिती करताना सिडकोने विविध नोड्समध्ये जवळपास १,३५,००० मालमत्ता विकसित केल्या आहेत. यात निवासी आणि वाणिज्यिक मालमत्तांचा समावेश आहे. विशेष म्हणजे सुरुवातीच्या काळात विविध उत्पन्न गटातील घटकांसाठी गृहयोजना राबविण्यात आली. काही भागात निवासी संकुले उभारली आहेत. अशा विविध प्रकल्पातील जवळपास अडीच हजार मालमत्ता अद्याप विक्रीविना पडून असल्याचे सिडकोच्या निदर्शनास आले आहे. खासगी संस्थेच्या माध्यमातून केलेल्या सर्वेक्षणातून ही बाब स्पष्ट झाल्याचा दावा सिडकोने केला आहे. महत्त्वाचे म्हणजे सिडकोच्या अनेक घरांचा मोठ्या प्रमाणात अपहार झाल्याच्या तक्रारी आल्या होत्या.

काही इस्टेट एजंट्सनी संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना हाताशी धरून सिडकोच्या शिल्लक मालमत्तांवर डल्ला मारल्याची अनेक उदाहरणे यापूर्वी समोर आली आहेत. त्यामुळे सध्या शिल्लक असलेल्या मालमत्तांचा अपहार होऊ नये, यादृष्टीने सिडकोने हे पाऊल उचलले आहे. शिवाय विविध कारणांमुळे विवादात सापडलेल्या मालमत्तांची जैसे थे स्थितीत विक्री करण्याचा निर्णय सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी घेतला आहे. त्यादृष्टीने त्यांनी संबंधित विभागाला कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. या मालमत्तांच्या विक्रीतून सिडकोला जवळपास दीड ते दोन हजार कोटी रुपयांचा महसूल प्राप्त होणार आहे.

## हुंड्यासाठी विवाहितेला जाळले;
### *पती आणि सासूला अटक*

**उल्हासनगर-** दिसायला सावळी आहे आणि लग्नात हुंडाही दिला नाही म्हणून एका विवाहितेला जाळून मारण्याचा धक्कादायक प्रकार अंबरनाथ ग्रामीण परिसरात घडला आहे. ही आत्महत्या असल्याचा बनावही सासरच्यांनी केला होता. पण पोलीस तपास आणि शवविच्छेदनात ही हत्या असल्याचे उघड झाले. याप्रकरणी उल्हासनगरच्या हिललाइन पोलीस ठाण्यात दोघांविरोधात हत्या आणि हुंडाबळीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पती आणि सासूला अटक करण्यात आली आहे.

काकडवाल येथील दूधकर कुटुंबातील वैशाली हिचा विवाह वसारच्या संगम वायले याच्याशी दोन वर्षांपूर्वी झाला होता. वैशाली विज्ञान शाखेतील पदवीधर होती. मात्र विवाहप्रसंगी योग्य मानपान आणि दागिने न दिल्याने पती संगम आणि सासू लीलाबाई तिचा अतोनात छळ करत असल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे.

२० जुलै रोजी मध्यरात्री वैशाली हिचा पती आणि सासूने तिला जिवंत जाळले. यात तिचा मृत्यू झाला. मात्र वैशालीने आत्महत्या केल्याचे तिच्या घरच्यांना सांगण्यात आले. त्यामुळे याप्रकरणी सुरुवातीला आत्महत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र पोलिसांनी प्रत्यक्ष घटनास्थळी पाहणी केल्यावर संशय बळावला.

# एपीएमसीत नियम धाब्यावर बसवून व्यापार

**नवी मुंबई–** मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या भाजी मार्केटमध्ये नियम धाब्यावर बसवून व्यापार सुरू आहे. 'डी' विंगमध्ये ५०० पेक्षा जास्त व्यापारी किरकोळ विक्री करत असून, त्यामधील बहुतांश जणांकडे परवानाच नाही. परवाना नसतानाही मार्केटमध्ये बिनधास्तपणे व्यापार करणाऱ्यांवर कारवाई करण्याकडे प्रशासन दुर्लक्ष करत आहे.



आशिया खंडातील सर्वात मोठी सहकारी घाऊक बाजारपेठ म्हणून मुंबई बाजार समितीची ओळख आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे मार्केट असा कागदावर उल्लेख असला, तरी प्रत्यक्षात तेथील स्थिती अत्यंत बिकट आहे. नियम धाब्यावर बसवून कामकाज केले जात असून, त्यामध्ये भाजी मार्केटमधील किरकोळ विक्रीचाही समावेश आहे. येथील 'डी' विंगमधील अपवाद वगळता प्रत्येक गाळ्यात किरकोळ (सेमी होलसेलर) विक्री करणाऱ्यांना जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या विक्रेत्यांचा कोणताही तपशील प्रशासनाकडे उपलब्ध नाही. ५०० पेक्षा जास्त व्यापारी असल्याचा अंदाज काही कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला आहे. नियमाप्रमाणे मार्केटच्या आवारामध्ये काम करणाऱ्या प्रत्येकाकडे परवाना असणे आवश्यक आहे. माथाडी कामगारांपासून अडत्यांपर्यंत सर्वांना हा नियम लागू आहे; परंतु 'डी' विंगमध्ये व्यापार करणाऱ्या अनेकांकडे कोणताच परवाना नाही. मार्केटमधील गाळेधारकांना नियमाप्रमाणे त्यांचे गाळे भाडेतत्त्वावर देता येत नाहीत; परंतु यानंतरही 'डी' विंगमध्ये किरकोळ विक्रेते व्यापार कसा करत आहेत. त्यांना गाळे भाडेतत्त्वावर दिले आहेत का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. या विषयी प्रशासनाला माहिती विचारली असता, एकही गाळा अधिकृतपणे भाडेतत्त्वावर दिल्याची नोंद उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले. किरकोळ विक्री करण्याची परवानगीही कोणालाच देण्यात आलेली नाही.

